**'विकास अभियंता (विद्युत/यांत्रिकी)'** पदावर
दि.१/१/२०१७ रोजी काम करणाऱ्या
अधिकाऱ्यांची अंतिम सेवाजेष्ठतासूची
प्रसिध्दीबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११०१८
क्र.प्रशा/१२/कावि/ १२५१ /२०१७
दिनांक २० / ११ /२०१७

वाचले क्र.
१) आदेश क्र.प्रशा/१२/कावि/ १०६८ /२०१७ दि. २७ / ९ /२०१७ अन्वये प्रसिध्द केलेली **'विकास अभियंता (विद्युत/यांत्रिकी)'** पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची दि.१/१/२०१७ रोजीची सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूची
२) मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६५/२०१२ दि.१९/१/२०१२
३) मा.आयुक्त सो. यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/७/कावि/६३५/२०१३ दि. ३१/५/२०१३
४) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दि.२९/८/२०१३
५) प्रशासन विभागाकडील दि. १६ / ११ / २०१७ चा मान्य प्रस्ताव

**आदेश**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/१०/२०११ अन्वये दि.१/१/२०१७ रोजी **'विकास अभियंता (विद्युत/यांत्रिकी)'** या पदावर नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकाऱ्यांची सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासुची उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सदरच्या सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासूचीमधील अधिकाऱ्यांचे नावाबाबत, जात, प्रवर्ग,जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता रुजू तारीख, जेष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा सुचीमध्ये नांव नसलेबाबत हरकती काही आक्षेप असल्यास त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासुची प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत संबंधित शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

**'विकास अभियंता (विद्युत/यांत्रिकी)'** पदाची सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासुची संबंधित अधिकाऱ्यांना बजाविलेबाबत संबंधित शाखाप्रमुखांकडुन अहवाल प्राप्त झालेला नाही. शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाजेष्ठतासुची प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास उपरोक्त वाचले क्रमांक २ व ३ अन्वये याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील. प्रस्तुत सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाज्येष्ठतासूचीवर **एकही** आक्षेप प्राप्त झालेला नाही.

सबब उपरोक्त वाचले क्रमांक ४ चे प्राप्त अधिकारान्वये **'विकास अभियंता (विद्युत/यांत्रिकी)'** पदाची दि.१/१/२०१७ रोजीची सर्वसमावेशक पंचवार्षिक प्राथमिक सेवाजेष्ठतासुची या आदेशान्वये अंतिम स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे. ही अंतिम सेवाजेष्ठतासुची मे.न्यायालयात दाखल केलेल्या अन्य कोणताही विशेष निर्वाणी अर्ज/ याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या जेष्ठतासुचीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

प्रतः- संबंधित विभाग -

२/- सदर आदेश व सेवाजेष्ठतासुची मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

प्रशासन अधिकारी - २
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

D:\sevajestata\सन 2017\वर्ग-१\24.विकास अभियंता वि.यां\अंतिम आदेश वर्ग 1.doc1

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

## विकास अभियंता (विद्युत/यांत्रिकी) पदाची दि:१/०१/२०१७ रोजीची अंतिम सेवाजेष्ठतासूची प्रसिद्धीबाबत.

वेतनश्रेणी :- १५,६००-०-३९,१०० ग्रेड वेतन :- ७६००

| अ.क्र | संगणक क्र | अधिका-याचे नाव | जात | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | विकास अभि.(वि/यांत्रिकी) रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नत/ सरळसेवा/ मर्यादीत विभागीय परिक्षा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | पद | तारीख | | |
| १ | ६०१२ | सुरगुडे अशोक धोंडू | सुतार | इतर मागास वर्ग | डी.ई.ई. | २७/०४/१९५९ | २५/०८/२००८ | पदोन्नती | कनिष्ठ अभि., विद्युत | ०२/०४/१९७९ | ३०/०४/२०१७ | सेवानिवृत्त दि.३०/०४/२०१७ |

प्रशासन अधिकारी (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८